आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद

# School Leadership Academy, Maharashtra

## मोड्यूल क्र.४३


## शालेय शिक्षणातून विद्यार्थ्यांचे सामाजिकीकरण करण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका

The Role of School Leadership in Socialization of Students through Education

**प्रस्तावना –**

सामाजिकीकरणाचे समाजजीवनातील महत्त्व अनन्यसाधारण आहे. सामाजिकीकरण प्रक्रियेच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक पिढी नव्या पिढीकडे आपल्या समाजाच्या पूर्वापार चालत आलेल्या समग्र सामाजिक वंशाचा ठेवा हस्तांतरित करीत असते. सामाजिक नियंत्रणाचे प्रभावी साधन म्हणूनही ही प्रक्रिया महत्त्वाची आहे. व्यक्तीमध्ये समाजाचा क्रियाशील सभासद बनण्याची पात्रता या प्रक्रियेद्वारे निर्माण होते. तसेच व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणण्याचे कार्य सामाजिकीकरणाच्या या प्रक्रियेद्वारे पार पाडले जाते. थोडक्यात सामाजिकीकरण ही समाजजीवनातील केंद्रीय प्रक्रिया आहे. परंतु या समाजाबरोबरीने त्याला त्याच्या आयुष्याला आकार द्यायचा असतो. या समाजातील घटकांचे शास्त्र समजून घेण्यासाठी 'शाळा' या संस्थेमध्ये त्याला विशिष्ट वयात दाखल केले जाते. या शाळेत तो समवयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये राहतो. त्या सगळयांशी जुळवून घेण्यासाठी तसेच जगातील विविध घटकांची ओळख करुन देण्यासाठी शाळेमध्ये एका अभ्यासक्रमाची निर्मिती केली जाते. समाजजीवन व व्यक्तीजीवन यांद्वारे वाढणाऱ्या नकारात्मक प्रवृत्तींना फोफावू न देता त्याऐवजी सामाजिक दायित्व व सामाजिक चेतना शिक्षणामुळे वाढीस लागली पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्याची जशी ही अवस्था आहे त्याप्रमाणे मूल्यशिक्षणाद्वारे सामाजिक कर्तव्यांची त्याला जाणीव करून देण्याचेही हेच योग्य वय आहे.

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणे व सामाजिक समस्यांसंबंधी स्वतःचे चिंतन निर्माण करण्यास शिक्षणाने विद्यार्थ्यांस सक्षम बनवावे. विद्यार्थी समाजात गेला की समाजहिताची भावना घेऊनच जाईल अशी व्यवस्था या शिक्षण पद्धतीत अपेक्षित आहे.




**“ शिक्षणातून सामाजिकीकरण “ विषयाची संकल्पना –**

सामाजिकीकरणामध्ये शिक्षणाची भूमिका फार महत्त्वाची आहे. सामाजिकीकरणाच्या माध्यमातून व्यक्तीचा समाजाचा पर्यायाने राष्ट्राचा विकास घडून येतो. आपापल्या कुवतीनुसार, इच्छेनुसार, आवडीनुसार स्वतःचे सामाजिकीकरण घडवून आणता येते. शाळा ही सामाजिकीकरणाची महत्त्वाची कार्यवाहिनी असल्याने उच्चतम व्यक्तिमत्व विकासाची संधी बालकाला आपण निर्माण करून देऊ शकतो. सामाजिकीकरणांमध्ये विविध प्रकारचे जीवनोपयोगी संस्कार निर्माण करून

विद्यार्थ्यांमध्ये ते शिक्षणामुळे रुजविता येतात. निती, मूल्ये, श्रद्धा, विश्वास यांचे परिपालन करता येते. समाजामध्ये विशिष्ट नीती, पद्धती, मूल्ये, रुढी, परंपरा, श्रद्धा, विश्वास रुजलेले असतात. त्यांचे सूक्ष्मपणे निरीक्षण करून चांगल्या गोष्टीचे परिपालन करण्याची संधी बालकास सामाजिकीकरणातून प्राप्त होते. सामाजिकीकरणामुळे कोणते समाजमान्य वर्तन आहे, याची सर्वांर्थाने जाणीव बालकांस मिळते. आचारविचारांना विशिष्ट वळण देता येते. सामाजिकीकरणाच्या माध्यमातून व्यक्ती समाजातील आचार-विचार, बोलणे, चालणे, ऐकणे, पाहणे इत्यादी शिकते. आंतरक्रिया हे समाज संबंध वाढवण्याचे साधन आहे. समाजातील सर्व घटकांमध्ये सुयोग्य व निकोप आंतरक्रिया साधून बालकास समाजातील सर्व घटकांशी असणारे समाजसंबंध विकसित करता येतात. या कामी शिक्षणातून आचार व विचारशैली बालकास प्राप्त होते. शाळा हे समाज विकासाचे केंद्र आहे. समाजाचे प्रतिबिंब शाळेत तर शाळेचे प्रतिबिंब समाजामध्ये दिसत असते. शाळेतून विद्यार्थ्यांना चांगला आहार, चांगल्या सवयी, चांगल्या वृत्ती निर्माण करता येतात व सामाजिकीकरणाची प्रक्रिया चांगली घडून येते. विद्यार्थ्यांचे सामाजिकीकरण होत असताना समाजातील वाईट प्रथा, रुढी, परंपरा तसेच अंधश्रद्धांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे परिणाम होत असतो. समाजातील अशा वाईट गोष्टीमुळे बालकाच्या सामाजिकीकरणात अडथळे निर्माण होतात. शिक्षणाद्वारे या सर्व गोष्टीवर प्रतिबंध आणता येतो. वैज्ञानिक दृष्टिकोनाची निर्मिती होण्यास मदत होते. सामाजिकीकरणाच्या माध्यमातून समाजास पोषक अशा व्यक्तींची निर्मिती होत असते. यासाठी शिक्षणातून समाजाच्या गरजा, समस्या लक्षात घेऊन तशा व्यक्ती तयार करता येतात. व्यावसायिक शिक्षण देता येते. बालकाच्या जीवनातील मुलभूत गरजा भागवण्यासाठी व्यावसायिक शिक्षणाची सुविधा दिली जाते. शिक्षणातील अभ्यासक्रम, अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर कार्यक्रम, गटकार्य, चर्चा, खेळ, प्रकल्प या माध्यमांतून विद्यार्थ्यांच्या सामाजिक कौशल्यांचा विकास होत असतो. एकंदरीत शिक्षणातूनच बालकांचे सामाजिकीकरण जलद गतीने घडून येते. शिक्षणातून सामाजिक परिवर्तन घडते तसेच सामाजिक नियंत्रण ठेवण्याचे काम साध्य होते. बालकाच्या सामाजिकीकरणांमध्ये शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असलेली दिसून येते.

NEP २०२० मध्ये शिक्षण आनंदी असायला हवे जेणे करून विद्यार्थ्याला शाळेत बसायला आवडेल. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शाळेत विविध उपक्रम आयोजित केले पाहिजे जेणेकरून त्याचा सामाजिक विकास व्हावयास हवा. NEP २०२० मध्ये समग्र, शोध-आधारित, चर्चा-आधारित आणि विश्लेषण-आधारित शिक्षण यावर भर दिला जाईल. त्यासाठी संकल्पना, कल्पना, अनुप्रयोग आणि समस्या सोडवणे यावर लक्ष केंद्रित करावे लागेल असे संगितले आहे. या बाबी पूर्ण होण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिकीकरण घडून येणे महत्वाचे आहे.

श्रीमती सुलक्षणा भरगंडे प्रशालेत 19 वर्षांपासून सहशिक्षिका या पदावर कार्यरत आहेत. गेल्या अनेक वर्षापासून शालेय नेतृत्वांतर्गत मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विभागापैकी स्पर्धा परीक्षा हा विभाग सांभाळतात तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक कार्यक्रमांची जबाबदारी पार पडतात. शिक्षणातून सामाजिकीकरण अंतर्गत विद्यार्थ्यांना समाजाशी जोडणे या संदर्भात अनेक उपक्रम व कार्यक्रम मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली घेतले जातात ज्यातून विद्यार्थ्यानी शालेय स्तरावरच नागरिकत्वाचे प्रत्यक्ष धडे गिरवावेत ही अपेक्षा असते. म्हणूनच शिक्षणातून सामाजिकीकरण याबाबतची शाळेची यशोगाथा सर्वांपर्यंत पोहोचावी आणि शालेय नेतृत्वाचे काम सर्वांपर्यंत पोहोचावे या उद्देशाने हे मोड्यूल विकसित करण्यात आले. मिपा संस्थेअंतर्गत विविध कामे चालतात. ती आमच्यापर्यंत पोहोचत असतात. वेबसाईटवर अनेक मोड्यूल पाहून श्रीमती भरगंडे यांना ही प्रेरणा मिळाली. शालेय नेतृत्वविषयक अनेक प्रशिक्षणे त्यांनी घेतली आहेत. शालेय नेतृत्व आणि व्यवस्थापन (PSLM) हे प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे तसेच मिपा संस्थेच्या यूट्यूबवरील वेबिनार व इतर कार्यक्रमांचा देखील नेहमी त्या लाभ घेतात. त्यातून प्रेरणा घ्यावी सदर मोड्यूल विकसित करण्यात आलेले आहे. शाळेत मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही अनेक कार्यक्रम राबवत असतो. आमच्या शाळेची आणि मुख्याध्यापकांची यशोगाथा सर्वांपर्यंत पोहोचावी हा या मागचा उद्देश आहे म्हणून हे मोड्यूल विकसित करत आहे.

## यशोगाथा
## शरदचंद्र पवार प्रशाला, सोलापूर
### व्यवस्थापन - खाजगी अनुदानित - विद्यार्थी संख्या – 710
### मुख्याध्यापक- श्री.तानाजी रामचंद्र माने

विद्यार्थ्यांना शालेय तासांमध्येच व नंतरही अधिकाधिक वेळा समाजात मिसळण्याची संधी प्राप्त व्हावी.यासाठी सामाजिक सर्वेक्षणे करणे, वस्तुनिष्ठ अहवाल तयार करणे, मुलाखती, गाठीभेटी, क्षेत्रीय भेटी, शैक्षणिक सहली इत्यादींचा समावेश असावा.सामाजिकीकरण शाळेत मोठ्या प्रमाणात सुरू होते.शाळेतच नागरिक होण्यासाठी आवश्यक सामाजिक बांधिलकीच्या बाबी विद्यार्थी शिकले तर त्यांचा पर्यायाने समाजाचा विकास होतो. विद्यार्थ्यांच्या शिक्षणातून त्यांचे सामाजिकीकरण करणे हि आजची प्रमुख गरज आहे. शाळेत सामाजिकीकरणा संदर्भात अनेक उपक्रम राबविले जातात. यात शाळेचे मुख्याध्यापक सर्व शिक्षकांच्या मदतीने सर्व नियोजन करतात व त्यातून योग्य अंमलबजावणी करून विद्यार्थ्यांसाठी उपक्रम राबविले जातात याचीच फलनिष्पत्ती म्हणून शाळेला तसेच विद्यार्थ्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

**शाळेला पुरस्कार-**

डॉ. कृ.शे. मार्डीकर आदर्श शाळा पुरस्कार, सोलापूर जिल्हा क्रीडा शिक्षक महासंघ-आदर्श शाळा पुरस्कार, सोलापूर जिल्हा साने गुरुजी कथामाला सानेगुरुजी मंगलयात्रा पुरस्कार,जिल्हा परिषद सोलापूर- स्वच्छताअभियान विशेष कार्य पुरस्कार,अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला मुंबई पुरस्कार, टाटा बिल्डिंग इंडिया पुरस्कार, द आर्ट ऑफ लिव्हिंग संस्था पुरस्कार असे विविध पुरस्कार शाळेला मिळाले आहेत.

शालेय विद्यार्थ्यांच्या प्रज्ञेचा शोध घेण्यासाठी शाळेत अनेक उपक्रम राबविले जातात. विद्यार्थी यामध्ये यश मिळवतात. राष्ट्रीय ऑलिंपियाड परीक्षेत विद्यार्थ्यांचे यश, शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थ्यांचा सहभाग व यश, राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (N.M.M.S) विद्यार्थ्यांचा सहभाग व यश, विविध प्रज्ञाशोध परीक्षेत विद्यार्थ्यांचा सहभाग, आय.आय.टी/नीट फाउंडेशन कोर्स,शैक्षणिक गुणवत्तेला स्वतःच्या नवप्रकल्पाद्वारे दिशादेणारे कार्य-अध्यापनात ज्ञानरचनावादाचा

समावेश अश्या अनेक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांच्या जास्तीत जास्त सहभागासाठी शाळा प्रयन्त करते. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य , पुणे आयोजित विविध ऑनलाईन उपक्रमात सहभाग जसे स्वाध्याय, अभ्यासमाला, शिकू आनंदे इ. प्रत्येक वर्षी विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर ठरवून त्यानुसार योग्य ती अध्ययन निष्पत्ती गाठण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात,उपचारात्मक अध्यापन, इंग्लिश स्पिकिंग,शिष्यवृत्ती परीक्षा, क्रीडा स्पर्धा, चित्रकला ग्रेड परीक्षा, हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा इत्यादींचे दररोज मार्गदर्शन वर्ग घेतले जातात, विविध ठिकाणी विज्ञान प्रदर्शनात सहभाग व यश, विज्ञान अध्यापक मंडळाच्या परीक्षेत सहभाग,कला - रांगोळी, चित्रकला स्पर्धा व यश, , वादविवाद स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, हिंदी राष्ट्रभाषा स्पर्धा, अभिनय स्पर्धा सहभाग महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षा इन्स्पायर अवॉर्ड प्राप्त अश्या प्रकारे अनेक परीक्षा मध्ये विद्यार्थी केवळ सहभागी होत नाहीत तर यशस्वी होतात.

वरील विविध परीक्षा व उपक्रमांसोबतच शाळा विद्यार्थ्यांना सामाजिकीकरणाच्या दृष्टीने अनेक प्रकारच्या खालील कामातून संधी उपलब्ध करून देते. शिक्षक व मुख्याध्यापक विद्यार्थ्यांच्या सहभागातून अनेक प्रकारची सामाजिक कामे स्वतः करतात व विद्यार्थ्यांना त्याबाबत मार्गदर्शन करतात व या कामातून विद्यार्थ्यांना सामाजिकीकरणाकडे नेतात.

**शाळेचे सामाजिक कार्य (उदाहरणादाखल कामाचे स्वरूप व माहिती खालील प्रमाणे) :-**

| अ.क्र. | सामाजिक काम | कामाचे स्वरूप | उपक्रमाचा उद्देश |
|---|---|---|---|
| 1 | नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड मुलांसाठी शाळेमार्फत निधी संकलन | शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांकडून वर्गणी स्वरूपात निधी संकलन. | सामाजिक जाणीव निर्माण होते, सहकार्याची भूमिका, जबाबदारीची जाणीव, दुसऱ्याच्या दु:खाची जाणीव होते. |
| 2 | शाळेतीलआई-वडील नसलेल्या मुलांचा वाढदिवस साजरा,यशस्वी दिव्यांग विद्यार्थी कौतुक सोहळा | विद्यार्थ्यांना एखादे पुस्तक भेट व पर्यटन स्थळी भेट व केक कापणे,दिव्यांग विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणे. | अवांतर वाचनास प्रोत्साहन, इतरांच्या आयुष्यात आनंद देणे,निसर्गाचे दर्शन,दिव्यांगविद्यार्थ्यांशी मैत्रीपूर्ण व्यवहार |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:f5e457e0-abd0-41d8-a47d-c837e09a3d64 |
| 3 | वृक्षारोपण,स्वच्छता अभियानात सहभाग | शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करणे, परिसर स्वच्छ करणे. | पर्यावरणाचे महत्त्व व स्वच्छतेचे महत्त्व यावर चिंतन<br>1.https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:b704d4c8-b7e2-411a-9798-4e08175acf5d<br>2.https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:8f5ea19e-4b87-45ab-95b4-fe7fd40316b1<br>3.https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:f0f556cb-a392-4183-87ab-5c4f724038a5 |
| 4 | झोपडपट्टीतील मुलांना शिक्षण | ज्यादा तास, आधुनिक शैक्षणिक साहित्याचा वापर करणे, श्यामची आई पुस्तकाचे अभिवाचन | श्यामची आई पुस्तकाचे अभिवाचन |
| 5 | पालक व मुलांसाठी आरोग्य शिबिर आयोजन<br>https://youtu.be/dVhTovB80SU | वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सहकार्याने आरोग्य तपासणी, आरोग्याचे महत्त्व विषयावर व्याख्यान | आरोग्याचे महत्त्व वाढविणे, आरोग्याची काळजी घेण्याची गरज वाढविणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:a1ae3fb0-ad2a-4891-979c-897bb63f9879 |
| 6 | शाळेतील मुली व महिलां पालकांसाठी छंदवर्गाचे आयोजन, | प्रशिक्षित व्यक्तीद्वारे अर्थार्जनास मदत होईल अशा वर्गांचे आयोजन व मार्गदर्शन, छंद वर्गाचे महत्त्व सांगितले जाते. | स्वतः विकासातून समाज विकास, समूपदेशन कलेद्वारे आर्थिक विकास, https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:8f18df4a-144b-44d0-ae0f-cfcdf448efab |
| 7 | शाळेतील मुलांसाठी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा https://youtu.be/WYVKwV4WqnI | प्रशिक्षित व्यक्तीद्वारे मार्गदर्शन, व्याख्यानाचे आयोजन | नेतृत्वाचे व व्यक्तिमत्व संवर्धनाचे महत्व समजते, व्यक्तिमत्व विकासाद्वारे प्रगती. https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:b9bbe49c-5936-45b6-b533-6507560af9d2 |
| 8 | मुलींसाठी स्वसंरक्षणाचे धडे https://youtu.be/_R0jaQCyLB0 | ज्यादा तासाचे नियोजन, प्रशिक्षकाची नेमणूक, स्वसंरक्षणाचे महत्त्व पटवून देण्यात येते. | मुलींना स्वसंरक्षणाचे महत्त्व व आवश्यकता समजते. https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:ad6e3f7e-3d85-43dd-8e3a-c0181d6c9b98 |

| | | | |
|---|---|---|---|
| 9 | आय.आय.टी./नीट फाउंडेशन कोर्स | ज्यादा तासाचे नियोजन, प्रशिक्षित शिक्षक नेमणूक, | विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली, भविष्यवेधी विचारांची सवय लागून मुले नियोजन करण्यास शिकले. https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:c327a0b7-cbf2-4223-b468-dfb27b17ec10 |
| 10 | सर्वधर्मसमभाव पथनाट्याचे ग्रामीण भागात आयोजन | विविध चौकात पथनाट्याचे आयोजन, गावातील नागरिकांचा समावेश | सर्वधर्मसमभावाचे महत्व पटले, सलोख्याचे वातावरण निर्माण झाले. |
| 11 | नवरात्रीनिमित्तविधवा, घटस्फोटीत कामगार महिला पालकांना नवदुर्गा सन्मान पुरस्कार https://youtu.be/cpLLPz_vEYQ https://www.youtube.com/live/rAQsCI9jCTM?feature=share https://m.facebook.com/story.php?story_fbid=pfbid0DjAKWXCRXqjzak5X1o7kMP5ShFQc8FYUU1jTbdsoCCn1YLQBPopZ171Srygh7C1il&id=100075514496178&sfnsn=wiwspmo&mibextid=RUbZ1f | सर्व वर्गशिक्षकांशी चर्चा करून विद्यार्थ्यांचे वर्तन, अभ्यास यांचा विचार करून तसेच मातापालकांचे स्वत:चा व्यवसाय,जबाबदाऱ्या सांभाळून पाल्याकडे जातीने लक्ष देतात अशांची निवड केली जाते. | विधवा,घटस्फोटीत महिलांना समाजामध्ये मान सन्मान देण्याची भावना विद्यार्थ्यामध्ये विकसित झाली. https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:3201cb6a-5fe4-4727-95bd-c283c74f176e |
| 12 | स्नेहालय-अनाथ मुलांच्या शाळेत जाऊन रक्षाबंधन, रक्षाबंधननिमित्त शाळेत राख्या बनवूनसीमेवरील सैनिकांना पाठवणे उपक्रम, माजी सैनिकांच्या रुग्णालयात सैनिकांनारक्षाबंधन कार्यक्रम | प्रातिनिधीक स्वरूपात काही विद्यार्थ्यांना घेऊन रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन | मुलांना सणाचा आनंद मिळाला,नात्यांचे महत्व कळाले, सैनिकांविषयी आदर,प्रेम निर्माण झाले. https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:8d9ed1f0-650c-4b1f-99b7-13972c066b17 |

| | | | |
|---|---|---|---|
| 13 | ब्रिजधाम वृद्धाश्रमास भेट व वृद्ध व्यक्तींशी गप्पा गोष्टी, तेथील परिसर स्वच्छता | सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन, विद्यार्थ्याकडून स्वच्छता करून घेतली जाते | विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळाला व स्वच्छतेचे महत्त्व तसेच वृद्धाविषयी प्रेम,जिव्हाळा असावा हे समजले. https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:24346120-569f-4c87-8c60-3462468aeb6e |
| 14 | परिसरातील नागरिकांसाठी योग व प्राणायाम शिबिर https://youtu.be/Pu-lNTbwq98 | शिबिर भरविली जातात शनिवारी व रविवारी योगासन वर्ग घेतले जातात | आरोग्याचे महत्त्व कळाले, योगाची सवय लागली https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:76c337c3-4498-44ca-89d7-97966fa22f82 |
| 15 | शाळेचे प्रत्येक वर्षी उत्साहात स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ | देशभक्ती व भारतीय संस्कृतीचे दर्शन | सुप्त गुणांना वाव मिळतो, मुलांना स्नेहसंमेलनातून संस्कृतीचे महत्त्व समजले,विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळाले. https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:b098d313-60a6-440d-884d-8f5346e5e440 |
| 16 | कोल्हापूर, सांगली पूरग्रस्त शाळेतील मुलांसाठी समाजातील नागरिक व पालकांकडून दीड लाख रुपयाचे साहित्य जमा करून सांगली शाळेला मदत | शिक्षकांकडून इच्छेनुरूप निधी संकलन, समाजातील दानशूर व्यक्तीकडून मदत घेतली जाते. | जबाबदारीची जाणीव निर्माण झाली,सामाजिक बांधीलकीची व सहकार्याची भावना निर्माण झाली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | १.https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:6716430d-7103-4b9e-932a-8514f3a27471<br>२.https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:b9e0fb51-07d8-4682-9276-5814a7497556 |
| 17 | शिक्षक,मित्र,पालक व समाजातील नागरिक यांच्याकडून डिजिटल वर्गासाठी ५०,०००/- रुपयाचे साहित्य लायब्ररीसाठी कपाट व ५०,०००/- रुपये किमतीची पुस्तके मिळवली, विद्यार्थ्यांना सायकल भेट, शालेय साहित्य भेट | डिजिटल वर्गासाठी इच्छेनुसार पालक व समाजातील नागरिक यांच्याकडून लोकसहभाग मिळविला जातो.<br>. | सामाजिक बांधिलकीची व सहकार्याची भावना निर्माण झाली.<br>समाजाचे देणे लागतो, समाजाचा एक भाग आहोत हि भावना वृद्धिंगत झाली.<br>1.https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:5952da84-91eb-41b0-8809-c7b73e6f4666<br>२.https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:56c125fe-0a3a-44d6-8a5d-0f5e69d98c79 |
| 18 | महिला सबलीकरण व कलेला वाव देण्यासाठी पालक महिला व शाळेच्या परिसरातील महिलांसाठी होम मिनिस्टर स्पर्धा आयोजन | शाळा व माता पालक यांच्यातील सहसंबंध दृढ करण्यासाठी बैठका कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन केले जाते. | माता पालकांच्या सुप्त गुणांना वाव मिळाला, मनोरंजन झाले, शाळेचे व माता पालकांचे संबंध चांगले झाले. |

| | | | |
|---|---|---|---|
| | https://drive.google.com/file/d/1Tho0TloY0LeNzHDdbim4H4hfgJfec198/view?usp=drivesdk | | https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:cb989aef-bda7-407a-9d82-9bc957808f16 |
| 19 | महिला मेळावे,स्त्री शक्ती सन्मान<br>https://youtu.be/ZGA3qHbJ0Hg<br>https://youtu.be/YPLDGVrp-FI | व्याख्यानाचे आयोजन, विविध स्पर्धा घेणे, थोर महिलांचा सन्मान करणे | जनजागृती होते, महिलांना आर्थिक लाभाविषयी फायदा झाला,स्त्री-पुरुष समानता व स्त्री विषयी आदर निर्माण झाला.<br>1.https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:4e1eb736-79c0-45c5-bf19-ee950ea9d036<br>2.https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:0aa8e443-1fab-4a30-8a0c-5178e7e87eed |
| 20 | समाजप्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रम<br>https://youtu.be/80tBymUIoEU<br>https://youtu.be/70nwyk2STiE | समाजातील ज्वलंत प्रश्नावर जनजागृती करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन | लोकांमध्ये जनजागृती निर्माण होण्यासाठी प्रयत्न<br>https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:66125d8e-582d-444f-8ade-f25cf7f4f3af |
| 21 | शाळेत ऐतिहासिक कार्यक्रमाचे आयोजन,आपत्ती व्यवस्थापन विषयक काम,रस्ता सुरक्षा अभियान सहभाग<br>https://youtu.be/fiuApVgkBSU<br>https://youtu.be/f5ZkTv9-5B0 | आपत्ती व्यवस्थापन विषयक काम,रस्ता सुरक्षा याविषयी जनजागृती करणे. | विद्यार्थ्यामध्ये जनजागृती निर्माण झाली, संकटकालीन परिस्थितीचे भान ठेवून कसे वागावे याची समज आली. |

| | | | |
|---|---|---|---|
| 22 | पाणी वाचवण्यासाठी सामूहिक शपथ | पाणी वाचवा, पर्यावरण वाचवायाविषयी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन | पाणी वाचवण्याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती हा हेतू https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:45cff3fb-aa9f-4b01-b9f9-1827bec10b54 |
| 23 | विद्यार्थ्यांसाठी कोरोना लसीकरण, दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन https://youtu.be/F2iWzn5d8pA https://youtu.be/WTsvy9U7Pyk | रक्तदान व कोरोना या रोगाविषयी जनजागृती करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन | रक्तदान व कोरोना या रोगाविषयी जनजागृती कार्यक्रमात सक्रीय सहभाग 1.https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:20d15ef2-29fb-4532-a759-90c512b6495b 2.https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:a03054d2-a6e0-4c40-8af9-88fe9eea265b |
| 24 | लोकसहभागातून शाळेसाठी मदत- मुस्कान शेख सोनाली मोरे या वडील नसलेल्या विद्यार्थिनींना आंतरराष्ट्रीय स्पर्धेला जाण्यासाठी दीड लाख रुपये समाजातून मदत मिळवून दिली,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सात लाख रुपये क्रीडा अनुदान. https://youtu.be/4MALuCanE68 | लोकसहभागाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यासाठी मदत उपक्रम | जबाबदारीची जाणीव निर्माण झाली,सामाजिक बांधीलकीची व सहकार्याची भावना निर्माण झाली. https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:43d0d927-7342-42a5-a6d1-c91ed4766a6a |
| 25 | पोलीस आयुक्तालयाच्या विविध राष्ट्रीय कार्यक्रमात सहभाग https://youtu.be/f5ZkTv9-5B0 | विद्यार्थ्यांच्या मनात पोलीस कर्मचाऱ्याविषयी आदरभाव निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय कार्यक्रमात सहभाग | विद्यार्थ्यांच्या मनात पोलीस कर्मचाऱ्याविषयी आदरभाव निर्माण करण्याचे प्रयत्न |

| | | | |
|---|---|---|---|
| | https://www.youtube.com/live/G5vaBzhKRXw?feature=share | | |
| 26 | मतदान जनजागृती कार्यक्रम आयोजन, सर्वधर्मसमभाव शांती पदयात्रेत सहभाग | विद्यार्थ्यामध्ये आपल्या हक्काची जाणीव करून देण्यासाठी मतदान रॅलीचे आयोजन करण्यात आले. | विद्यार्थ्यामध्ये मतदान केल्यामुळे हक्क कसे मिळवता येतात याची जाणीव झाली,मतदानाचे महत्व समजले.<br>1.https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:98c2a71a-139f-478f-a7ec-ea217bd81f5a<br>२.https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:cf71ade5-ebd2-44eb-911d-30c25dbeea1a |
| 27 | लोकवर्गणीतून साडेतीन लाख रुपयाचे मुलींसाठी स्वच्छता गृह बांधले, आमदार निधीतून संगणक व प्रिंटर एक लाख रुपये किमतीचे साहित्य | लोकसहभागातून कामे कशी होतात याचे ज्ञान विद्यार्थ्यांना देण्यासाठी उपक्रम | लोकसहभागाचे महत्त्व समजले,सामाजिक बांधीलकीची व सहकार्याची भावना निर्माण झाली.<br>https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:161d3737-396c-4677-81c0-eb9d71eb29f8 |
| 28 | साहित्य संमेलन वकाव्य संमेलनात शाळेतील विद्यार्थ्यांचा सहभाग<br>https://youtu.be/VpNH1cIl01o<br>https://youtu.be/Wj0_Weu5Q6w<br>https://www.youtube.com/live/dz19dNx1q7U?feature=share | साहित्य व काव्य संमेलनातून विद्यार्थ्यांमध्ये साहित्या संबंधी आवड निर्माण करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन | विद्यार्थ्यांमध्ये साहित्य वाचन व काव्य निर्मिती कार्यक्रमात सक्रीय सहभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| 29 | शाळेत प्रत्येक शनिवारी दप्तराविना शाळा घेऊन आनंददायी शिक्षण देणे. | विद्यार्थ्यांसाठी पुस्तकाशिवाय विविध कला कौशल्यामत्क उपक्रमांचे आयोजन | उपक्रमात सक्रीय सहभाग |
| 30 | नवोपक्रमात सहभाग मिळविणे | विद्यार्थ्याचा नवोपक्रमामध्ये सहभाग वाढला व त्यातून शिकण्याची प्रक्रिया दिसून आली. | विद्यार्थ्याचा नवोपक्रमातून ज्ञान प्राप्ती https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:15b5c714-b879-4eb0-8345-edb1bc025216 |
| 31 | जागतिक योग दिनानिमित्त विद्यार्थी व पालकांसाठी योग दिनाचा कार्यक्रम https://youtu.be/2MpTnXU1J5s | विद्यार्थी व पालकांना योगाचे महत्त्व पटवून देण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन | पालक व विद्यार्थ्यांचा उस्फुर्त सहभाग |
| 32 | जागर संविधानाचा ग्रामीणभागात जाऊन कार्यक्रम | संविधानातून आपल्या कर्तव्य व हक्काची जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन | नागरिकांना आपल्या कर्तव्य व हक्काची जाणीव होणे हा हेतू https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:a33dbc93-92dd-493d-9cf0-ea57fac6f461 |
| 33 | साक्षरता दिंडीमध्ये सहभाग, पोस्टर प्रदर्शनात सहभाग https://youtu.be/zEZ9dNSskq0 | साक्षरतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी कार्यक्रमाचे नियोजन | नागरिकांमध्ये साक्षरता निर्माण करणे हा हेतू https://acrobat.adobe.com/link/track?uri=urn:aaid:scds:US:9c3d681d-a707-4564-b027-3d6efaba9e6e |
| 34 | भ्रष्टाचार विरोधी लाचलुचपत कार्यालयाच्या जनजागरण मोहिमेत सहभाग. | भ्रष्टाचारविरोधी जनजागरण मोहिमेत सहभागाचे नियोजन | भ्रष्टाचारामुळे होणारे दुष्परिणाम समजले. |
| 35 | 'आजादी का अमृत महोत्सव'मध्ये सहभाग https://drive.google.com/file/d/1UUTiT8Rywn0Q5vFq_UkJpBmhCfUZWdZx/view?usp=drivesdk | स्वतंत्र भारताचे महत्व अबाधित राहावे यासाठी कार्यक्रमात सहभागाचे नियोजन | भारताच्या स्वातंत्र्याविषयी अधिकची माहिती मिळाली. अनेक थोर देशभक्तांच्या कार्याची ओळख झाली. |

अशा प्रकारे केवळ शासन स्तरावरून सुरु असलेले शैक्षणिक उपक्रम कार्यक्रम स्पर्धा विविध परीक्षा एवढेच सीमित कार्य न ठेवता मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आता पासूनच ते समाजाचा एक महत्वाचा भाग आहेत या दृष्टीने नागरिकत्वाचे मूल्य त्यांच्यात रुजावे यासाठी अनेक कार्यक्रम घेतले व प्रत्येक वर्षी नव्याने भर टाकत असे कार्यक्रम घेण्याचे नियोजन करण्यात येते.

**शालेय नेतृत्वासाठी मोड्यूलची उपयुक्तता -**

समाजातील विविध समूहांकडून व्यक्तीचे सामाजिकीकरण घडवून आणले जाते. यात कुटुंब हे एक प्रभावी साधन आहे. त्यानंतर बालकाचा जास्त संपर्क शाळेशी येत असल्याने शाळा हे सामाजिकीकरणाचे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. शालेय नेतृत्व म्हणजे मुख्याध्यापक व त्यांचे सहकारी शिक्षक यांच्या कामातून न कळत विद्यार्थ्यांच्या सामाजीकीकरणाची प्रक्रिया सुरु होते आणि वैशिष्ट्यपूर्ण नियोजनपूर्वक अश्या उपक्रम, कार्यक्रम यांचा समावेश शालेय प्रक्रियेत केला तर विद्यार्थ्यांच्या सामाजीकीकरणाची प्रक्रिया गतिमान होते.

विद्यार्थ्यांच्या सामाजिकीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली तर अनेक प्रकारचे फायदे शाळेला, पालकांना व विद्यार्थ्यांना होतील मात्र त्यासाठी खालील बाबींची अंमलबजावणी आवश्यक आहे. विद्यार्थ्याची उपस्थिती टिकविणे, प्रत्येक विद्यार्थ्यांना इयत्ता निहाय अध्ययनस्तर प्राप्तीसाठी शाळेने प्रभावी नियोजन व अंमलबजावणी करणे, विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुरूप त्यांना योग्य संधी प्राप्त करून देणे. त्यासाठी शालेय स्तरावर विविध स्पर्धा, उपक्रम व कार्यक्रम आयोजित करणे यासर्व प्रक्रियेत मुख्याध्यापक, शिक्षक, पालक यांच्यात समवाय, उत्तम संबंध असतील तर बालकाचे सामाजीकीकरण गतीने होईल. म्हणूनच सदर मोड्यूलचा अभ्यास शालेय नेतृत्वाने करावा आणि अनेक सामाजिक उपक्रमांच्या आयोजनातून विद्यार्थी यासाठी स्वतःच्या शाळेत तसे नियोजन करावे अश्या नियोजनासाठी सदर मोड्यूल शालेय नेतृत्वाला उपयुक्त होईल असे वाटते.

**संदर्भ साहित्य -**

1. जगताप, ह.ना.(2007),'शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने', नित्यनूतन प्रकाशन, पुणे.
2. कुंडले, म.बा.(2003), 'शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र' , महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, विद्या प्रकाशन, दहावी आवृत्ती. पुणे.
3. दुनाखे,अरविंद आणि देशपांडे, लीना, (2007), 'प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र', नित्यनूतन प्रकाशन, पुणे.

4. भंडारी, प.ब.(1972),'शैक्षणिक समाजशास्त्र', राबिल पब्लिकेशन, सातारा.
5. शरयू बाळ सोहनी, भा. के. बालमानसशास्त्र, पुणे, 1964.
6. साळुंखे, सर्जेराव, ‘समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना’, पुणे,1996.
7. Jayaswal, S.R., (1985), 'Sociological Foundational of Education', Prakashan Kendra, Lucknow.
8. Mathur, S.S.,(2008), 'Sociological approach to Indian Education', Vinod Pustak Mandir, Agra.
9. https://maharashtratimes.com/editorial/article/school-and-socailization/amp_articleshow/61939156.cms
10. https://navprabha.com/
11. https://www.upkarmarathi.com/2021/06/shikshan-ani-samaj shala. Html ? m =1

**मोड्यूल विकसक**
श्रीमती सुलक्षणा किसनराव भरगंडे
सहशिक्षक
शरदचंद्र पवार प्रशाला,
सोलापूर आणि
डॉ.कल्पना जोशी
समन्वयक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद

**समन्वयन**
डॉज्योती कुलकर्णी.
समन्वयक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद

**मार्गदर्शक**
श्री.रमाकांत काठमोरे
संचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद